# सभा इतिवृत्त - मराठी विभाग

## दि. १८/७/२०२२

दि. १८/७/२०२२ रोजी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा मा. प्राचार्य दालनात स. ११.३० वा. मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सभेत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ चे वार्षिक नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे
मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे
डॉ. बाळासाहेब अनुसे

विषय क्र.१ - शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे वार्षिक नियोजन करताना एकूण अनुदानित कार्यभार (४०), विना अनुदानित कार्यभार (३२) या संदर्भात आढावा घेऊन पदव्युत्तर विभागाच्या कार्यभाराचा विचार करून २ विनाअनुदानित अध्यापकांची नेमणूक करण्यासंदर्भातील मागणी संस्थेकडे करण्याचे ठरले.

विषय क्र.२ - प्रथम वर्ष कला शाखेचे अध्यापन आजपासून सुरु झाले असून त्या संदर्भात आढावा घेण्यात आला. प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया दि. २७/६/२२ पासून सुरु झाली असून आजअखेर सुमारे ३१० प्रवेश झाले असून तिसरी तुकडी व वर्कलोड संदर्भात चर्चा झाली.

विषय क्र.३ - दि. २७/७/२२ पासून प्रथम व द्वितीय वर्षाचे बहिःस्थ मूल्यमापन प्रक्रिया महाविद्यालयात होणार असल्याने मराठी विभागाशी संबंधित सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व पुनःमूल्यांकन संदर्भात चर्चा झाली.

विषय क्र.४ - दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या हर घर तिरंगा उपक्रमाची तयारी संदर्भात चर्चा करण्यात आली.

विषय क्र.५ - दि. २४ ऑगस्ट २०२२ रोजी होणाऱ्या हुतात्मा राजगुरु आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेची जबाबदारी डॉ. संजय शिंदे यांनी घ्यावी. त्या संबंधी तयारी करावी, अशी सूचना मा. प्राचार्यांनी केली. उपक्रम, अंतर्गत परीक्षा, वर्कलोड, प्राध्यापकांचे कार्य या संदर्भात मा. प्राचार्यांनी मार्गदर्शन करून सभा समाप्त झाली.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.